नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/04/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### मध्यप्रदेश येथुन अवैध मोहाफुल दारू ची वाहतुक करणाऱ्यास वाहनासह अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 21.03.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक सावनेर उपविभागांतर्गत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, सद्या महाराष्ट्रात कोविड 19 संबंधाने कडक निर्बंध असल्याने मध्यप्रदेश येथुन एक इसम मारोती अल्टो कार वरून दारूची वाहतुक करीत असल्याचे खबरेवरून पोस्टे खापा हद्दीतील रायवाडी बसस्टॅंड जवळ नाकाबंदी करून मारोती अल्टो कार क्र. एमएच 31 सीएम 5828 वाहनास थांबवुन झडती दरम्यान चालक नामे राधेश्याम सुधाकर खुबालकर व 1 दोन्ही रा. खापा यांचे ताब्यातुन 200 लि. मोहाफुल दारू कि. 40,000/– रू. व कारसह एकुण 3,40,000/– रू. चा माल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूध्द पोस्टे खापा येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता आरोपी व मुद्देमाल पोस्टे खापा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात पोउपनि नरेंद्र गौरखेडे, सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार निलेश बर्वे, नापोशि राजेंद्र रेवतकर, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, चालक पोलीस नायक अमोल कुथे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर